स्थापना : १९५४

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर

कार्यालय : (०२१६४)२७१३४६
निवास : (०२१६४)२७१७९४

रयत शिक्षण संस्थेचे

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड.

पिन-४१५ १२४. जि.सातारा (महाराष्ट्र) पी.ऑ.बॉ.नं.३

कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ)

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक : पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट.

**प्राचार्य : अरूण बर्गे**
एम.ए.

संदर्भ क्र. : २६०९/२/०३-०४
दिनांक : ९-१२-२००३

## :- प्रमाणपत्र -:

श्री. शहाजी जगन्नाथ पाटील हे या महाविद्यालयाचे २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात एम.फिल [मराठी] पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थी होते. त्यांनी आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे विशेष ". [ गव्हनेर व महापूर च्या आधारे ] या विषयावर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. त्यांची प्रबंधिका एम.फिल परीक्षेसाठी स्विकारावी अशी मी शिफारस करतो.

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE
KARAD

प्राचार्य,
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.

# प्रतिज्ञापत्र

**आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे विशेष. ( गवनेर व महापूर) या कथासंग्रहाच्या आधारे** या विषयावरील. सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठ, एम. फिल्. या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कराड :

**प्रा. शहाजी जगन्नाथ पाटील**

दिनांक : २३।१२।२००३

**प्रा. डॉ. के. बी. कुंदप,**
माजी मराठी विभाग प्रमुख,
'कलासागर बंगला', विद्यानगर,
स. गा. म. कॉलेजसमोर, कराड.
जि. सातारा.

# प्रमाणपत्र

प्रा. श्री. शहाजी जगन्नाथ पाटील यांनी आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे विशेष ( गवनेर व महापूरच्या आधारे) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने ही प्रबंधिका त्यांनी स्वत: पूर्ण केली आहे. हा प्रकल्प विद्यापीठाच्या एम. फिल्. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही, याची मला खात्री वाटते.

मार्गदर्शक

# भूमिका

"आप्पासाहेब खोत यांच्या कथा लेखनाचे विशेष" हा विषय एम. फिल्. प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला. तो मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप सर यांच्याशी सल्लामसलत करूनच.

बी. ए. भाग तीनचा आठवा पेपर शिकवताना ग्रामीण साहित्याचे खूपच वाचन केले. या वाचनातून ग्रामीण जीवनाचे अनोखे दर्शन घडले. अनुभूती आणि आविष्कारसंपन्न असलेल्या विविधतापूर्ण ग्रामीण कथा मनाला स्पर्शून गेली. मी ही एका खेड्यात वाढलो. घडलो. त्या खेड्याचे प्रतिबिंब मला या साहित्यात आढळले. शिवाय आप्पासाहेब खोतांचे 'गवनेर' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. त्यातून मला वाटले की, लेखक खोत यांनी माणूस आणि माती याचं नातं बदलत्या ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना परिणामकारकरित्या मांडल्या आहेत. त्यांच्या कथेचा आशय अभिव्यक्तीचा आविष्कार ही वेगळा वाटला. त्यामुळे त्या लेखकाचे नेमके विशेष तपासावेत ही भूमिका ठेवूनच मी हा विषय निवडला आहे. लेखक खोत यांच्या लेखनाचे सामर्थ्य काय आहे यासंबंधी काही विचार मांडावा ही माझी या संशोधनामागील भूमिका आहे.

'गवनेर' व 'महापूर' या दोन कथासंग्रहाच्या अनुसंधाने ग्रामीण जीवनाच्या बदलत्या वृत्ती - प्रवृत्ती , व्यथा, वेदना त्यातून निर्माण झालेला ताणतणाव तसेच माणुसकी नाती हरवत चाललेली माणसे त्यांचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून व ग्रामीण जीवन व त्यांच्या लेखनातील विशेष समजून घेण्यासाठी हे कथासंग्रह अभ्यासनीय वाटले व हा विषय निवडल्यामुळे आनंद झाला. मार्गदर्शकांनीही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला. वास्तविक प्रस्तुत

अभ्यासाविषयीची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करून देण्यापर्यंत माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. कन्हैया कुंदप, माजी प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख स. गा. म. कॉलेज, कराड यांनी जे बहुमोल मार्गदर्शन केले, प्रबंधिकापूर्ततेसाठी प्रेरणा दिली म्हणून त्यांचे आभार मानणे माझे आद्य कर्तव्य आहे. लेखक श्री. आप्पासाहेब खोत व सौ. वहिनी लतादेवी खोत यांच्या बहुमूल्य सहकार्यामुळेच मी ही प्रबंधिका पूर्णत्वास नेऊ शकलो, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच!

ही प्रबंधिका पूर्णत्वास नेताना सतत प्रेरणा देणारे शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य बी. ए. मिस्त्रीसर, सिनियर व ज्युनियरचे सर्व प्राध्यापक बंधू, सतत आशीर्वाद व मायेचे ममत्व देणारे गुरूवर्य डॉ. र. ना. ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. बाबूराव गुरव, डॉ. यशवंत पाटणे, प्रा. अंगापूरकर, प्रा. शेडगे, प्रा. खुळपे, प्रा. पार्लेकर, प्रा. युवराज पाटील यांचाही मी आभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी स.गा.म. कॉलेज कराड ग्रंथालय, पी. डी. व्ही. पी. कॉलेज, तासगांव, ग्रंथालय, एस. बी. एस. कॉलेज, कराड ग्रंथालय व ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांचेही आभार. शेवटी प्रबंधिकेची छपाई व बांधणी वेळेत पूर्ण करून देणारे राज डी.टी.पी. चे आर. जी. देशपांडे व दत्त एंटरप्रायझेसचे श्री. फुलंब्रीकर यांचेही मी आभार मानतो.

⁕✱⁕